| पुणे जिल्हा परिषद- Process Mapping -Template | | | | |
|---|---|---|---|---|
| | | विभागाचे नाव | सामान्य प्रशासन विभाग | |
| अ. क्र. | प्रक्रिया स्थिती (Steages of Process Mapping) | बाब | माहिती | शेरा |
| PC१ | प्रक्रिया ओळख व वर्गीकरण (Process Identification and Classification) | प्रक्रियेचे नाव | जिल्हा परिषद संवर्गाकडील वर्ग -३ कर्मचा-यांची (शिक्षक संवर्ग वगळून) आंतरजिल्हा बदली बाबत. | |
| PC२ | | कार्यासन संकेतांक (उदा. आस्था1, लेखा 4) | आस्थापना - २ | |
| PP१ | प्रक्रिया प्रस्तावित करणे (process proposal) | प्रक्रिया प्रस्तावित करणाऱ्या अधिकारी /कर्मचारी (Maker)- पदनाम | वरिष्ठ सहाय्यक | |
| PP२ | | संदर्भीय कायदा, नियम मॅन्युअल, अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रक, न्यायालय निकाल, शासन पुस्तके,पत्रे इत्यादी क्रमांकासह शिर्षक नमुद करावेत. | १.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ चा नियम ६ (८)<br>२.ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन शुध्दीपत्रक क्र. जिपब-०७११/प्र.क्र.११३/११/आस्था १४ दि. २९/९/२०२११<br>३.ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन शुध्दीपत्रक क्र. जिपब-०७११/प्र.क्र.११३/११/आस्था १४ दि. ११ नोव्हेंबर २०११<br>१.आतरजिल्हा बदलीचे नेमणूक देणे आणि अन्य जिल्हा परिषदेकडील कर्मचाऱ्यास हजर करुन घेण्यास मान्यता देण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सक्षम आहेत.<br>२.त्या कर्मचाऱ्याची पाच वर्षे सलग सेवा त्याच्या मूळ जिल्हा परिषदेमध्ये होईल अस कर्मचारी आंतरजिल्हा बदलीस पात्र आहे.<br>३.आपसी आंतर जिल्हा बदलीसाठी पाच वर्षाची अट लागू आहे.<br>४.पती-पत्नी एकत्रीकरण आणि अपंग कर्मचारी ,माजी सैनिक प्रवर्गातून निवड प्रवर्गातून नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना आंतर जिल्हा बदलीसाठी तीन वर्षे सेवा होण आवश्यक आहे. | |
| | | | ५.आंतर जिल्हा बदलीची संधी कर्मचाऱ्यास त्याच्या पूर्ण सेवाकालावधीमध्ये दोन वेळा घेता येईल.<br>६.कर्मचाऱ्याची निवड ज्या प्रवर्गातुन झाली आहे त्याच प्रवर्गाच्या पदावर आंतर जिल्हा बदलीने नियुक्ती दिली जाईल.<br>७.आंतरजिल्हा बदली ही कर्मचाऱ्यांच्या विनंतीवरुन केली जात असल्याचे प्रवासभत्ता आणि पदग्रहण अवधी अनुज्ञेय नाही.कार्यमुक्त केल्यानंतर दुस-या दिवशी नवीन जिल्हा परिषदेमध्ये हजर होणे आवश्यक आहे.<br>८.आंतरजिल्हा बदलीसाठी प्राप्त प्रस्तावानुसार जेष्ठता लावली जाते.<br>९.आंतरजिल्हा बदली ही सरळसेवेच्या रिक्त पदावरच करता येते. पदोन्नतीच्या रिक्त पदावर करता येत नाही.<br>१०.आंतरजिल्हा बदलीने हजर झालेल्या कर्मचाऱ्याची जेष्ठता तो हजर झालेल्या तारखेपासून लागेल मात्र १०,२०,३० वर्षाचा लाभ देण्यासाठी त्याच्या मागील सेवेचा विचार केला जाईल.<br>११.विहित वेळापत्रकानुसार आंतरजिल्हा बदलीबाबतची कार्यवाही करणे. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| PP३ | | प्रस्तावासोबत जोडावयाची कागदपत्रे उदा. विहित नमुन्यातील अर्ज, खरेदीचे बिल, आधार कार्ड आदी | लाभार्थी/ व्यक्तींची वैयक्तिक कागदपत्रे | १ कर्मचा-याचे संपूर्ण नाव<br>२ धारण केलेल्या पदाचे नाव<br>३ नोकरीचे सध्याचे ठिकाण, तालुका व जिल्हा<br>४ कार्यरत जिल्हा परिषदेतील नेमणूकीचा दिनांक<br>५ कार्यरत जिल्हा परिषदेतील एकूण सेवा<br>६ कर्मचा-याचा जातीचा प्रवर्ग<br>७ कर्मचा-याची नेमणूक ज्या जातीच्या प्रवर्गात झाली आहे तो जातीचा प्रवर्ग<br>८ जिल्हा परिषदेमध्ये कायम अथवा अस्थायी<br>९ कायम असल्यास कायम झाल्याचा दिनांक<br>१० आंतर जिल्हा बदलीसाठी विभाग प्रमुखांकडे अर्ज सादर केल्याचा दिनांक<br>११ जिल्हा परिषदेकडे अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक<br>१२ आंतर जिल्हा बदलीच्या अटी मान्य असल्याबाबत कर्मचा-याचे संमतीपत्र प्राप्त झाले आहे किंवा कसे<br>१३ आंतर जिल्हा बदली मागण्या बाबतचे कारणे.<br>१४ कर्मचा-याविरुध्द विभागीय चौकशी चालू/प्रस्तावित आहे किंवा कसे ?<br>१५ आंतर जिल्हा बदलीबाबत अपवादात्मक परिस्थिती आहे किंवा कसे याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्पष्ट अभिप्राय<br>१६ आंतर जिल्हा बदलीने कार्यमुक्त करणेस कार्यरत संबधित जि.प.ची सहमती आवश्यक<br>१७ सदर जिल्हा परिषद कर्मचा-यास त्याची ज्या जातीच्या प्रवर्गातून नियुक्ती झाली आहे त्याच जातीच्या प्रवर्गात आंतर जिल्हा बदलीने कर्मचा-यांच्या जातीच्या प्रवर्गातीलच रिक्त पदांवर नेमणूक देण्यास सहमत आहे किंवा कसे<br>१८. से.प्र.प.उत्तीर्ण झालेची नोंद | |
| | | | कार्यालयीन कागदपत्रे | लागू नाही | |
| PP४ | | प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आवश्यक उपक्रम, कामाचे वार्षिक नियोजन, परीक्षा, मेळावे, कागदपत्र तपासणी कॅम्प , विशेष मोहिमा, प्रचार प्रसिध्दी | | लागू नाही | |
| PP५ | | प्रक्रिया प्रस्तावित करताना जिल्हा परिषद विभाग/ पंस/ ग्रापं/ जि. प. कडील अन्य क्षेत्रीय कार्यालये तसेच शासनाच्या विभाग/ उपक्रम/ मंडळे / महामंडळे / मनपा/ नपा/ कटकमंडळे/ खाजगी संस्था यांचेकडून प्राप्त करावयाची माहिती, मान्यता, शिफारस | | लागू नाही | |
| PP६ | | तपासणी अधिकारी स्तर पदनाम (Checker) (स.प्र.अ/क.प्र.अ/ पर्यवेक्षीय अधिकारी ) | | सहाय्यक प्रशासन अधिकारी /कनिष्ठ प्रशासन अधिकारी | |
| PP७ | | प्रक्रिया मंजुरी देताना पडताळुन पहावयाच्या बाबी | | PP २ व PP ३ अन्वये सर्व बाबी तपासून आंतरजिल्हा बदलीने पद रिक्त असलेस NOC देणे पद रिक्त नसलेस तसे कळविणेबाबतचे प्रारुप संबधीत जिल्हा परिषदेला देणेसाठी तयार करणे. | |
| PA१ | प्रक्रिया मंजुरी (process approval ) | मान्यता अधिकारी स्तर पदनाम (खातेप्रमुख /इतर ) | | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) | |
| PA२ | | यादी/ आराखडा मान्यता अधिकार समितीस असल्यास, समिती नाव | | लागू नाही | |
| PA३ | | Endorsement (समर्थन ) अधिकारी स्तर पदनाम (मुकाअ /अति मुकाअ/ संबधित खातेप्रमुख) | | मुख्य कार्यकारी अधिकारी | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| PM१ | प्रक्रिया त्रुटीशोध (process Mapping ) | मंजुरी प्रक्रियेमध्ये सातत्याने आढळणाऱ्या त्रुटी | आंतर जिल्हा बदली प्रकरणांची नोंदवही नसणे. | |
| PI१ | प्रक्रिया सुधारणा (process improvization ) | अचुकता वेळेची बचत , मनुष्यबळ कार्यक्षम वापर , पारदर्शकता याकरिता माहिती तंत्रज्ञानाचा व संगणक आज्ञावली वापर करता येण्याजोग्या उपप्रक्रिया /बाबी | शिक्षक संवर्गातील आंतरजिल्हा बदली प्रक्रिये प्रमाणे सर्व कर्मचारी यांचेसाठी आंतर जिल्हा बदली प्रक्रिया ऑनलाईन होणे आवश्यक आहे. | |
| PI२ | | तांत्रिक (Technical) ज्ञान कमी पडत असल्यास प्रशिक्षण स्वरुप, अभ्यासक्रम | लागू नाही | |
| PI३ | | मुळ संकल्पना, उद्देश , लेखा संहिता, प्राधिकरण यांचे अधिकार यास धक्का न लावता प्रक्रिया सुधारणे करिता शासन स्तरावर प्रस्तावित करायच्या बाबी | | |